CSMSS | Since 1986

# छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था

कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर. (महाराष्ट्र) ☎ : 0240 - 2646464

17

**सर्व अधिष्ठाता,प्राचार्य,**
**संस्थेअंतर्गत सर्व महाविद्यालये,**

**विषय: प्रसिद्धीपत्रक, बातम्या व इतर माहिती माध्यमांत संस्थेच्या पदाधिकारी व अधिकारी यांचे नावे व पदे प्रोटोकॉलनुसार नमूद करण्याबाबत.**

असे वारंवार निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या विविध बातम्या, अहवाल, प्रसिद्धीपत्रके, निमंत्रण पत्रिका इत्यादी माहिती माध्यमांमध्ये संस्थेतील पदाधिकारी व अधिकारी यांच्या नावांचा आणि पदांचा उल्लेख अनेकवेळा अपूर्ण, विसंगत किंवा प्रोटोकॉलच्या विरुद्ध आढळून येतो आहे. प्रत्येक पदाचा निश्चित मान आणि जबाबदारी असते. त्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीच्या नावासोबत त्यांचे पद योग्य क्रमानुसार आणि शुद्धतेने नमूद करणे हे संस्थेच्या सन्मानास अनुकूल ठरते. त्यामुळे महाविद्यालयातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या सर्व बातम्यांमध्ये व माहितीपत्रकांमध्ये पदाधिकारी आणि अधिकारी यांची नावे व पदे निर्धारित प्रोटोकॉलनुसार नमूद करणे अनिवार्य आहे.

भविष्यात अशा विविध बातम्या, अहवाल, प्रसिद्धीपत्रके, निमंत्रण पत्रिका इत्यादी माहिती माध्यमांमध्ये प्रसिद्ध करताना संबंधित माहितीची नीट पडताळणी करण्यात यावी, जेणेकरून कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा किंवा पदाचा चुकीचा उल्लेख होणार नाही. ही बाब संबंधित व्यक्तींना नाहक गैरसमज व गैरसोयीस कारणीभूत ठरते. तसेच संस्थेच्या माहितीचा अधिकृतपणाही यामुळे प्रभावित होतो. तसेच त्यावर संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य बातमी न वाचता सही करून माझ्याकडे पाठवितात, ही बाब अतिशय गंभीर असून मा. सचिव आणि विश्वस्त यांनी याची गंभीर दखल घेतली आहे.

यापुढे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या विविध बातम्या, अहवाल, प्रसिद्धीपत्रके, निमंत्रण पत्रिका इत्यादी माहिती माध्यमांमध्ये यावर संस्थेच्या पदाधिकारी आणि अधिकारी यांचे नाव आणि पद प्रोटोकॉलनुसार समाविष्ट करणे अनिवार्य आहे.

याची आपण नोंद घ्यावी.

To,
All Heads and
all staff to note
and follow strictly
on priority
09/6/25

**(डॉ. एस. जी. देशमुख)**
प्रशासकीय अधिकारी

**प्रत:**

१) मा. सचिव, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर
२) प्राचार्य, सीएसएमएसएस आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, कांचनवाडी, छत्रपती सभाजीनगर
३) अधिष्ठाता, सीएसएमएसएस दंत महाविद्यालय व रुग्णालय, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर
४) संचालक, सीएसएमएसएस कृषि महाविद्यालय, काचनवाडी, छत्रपती संभाजीनगर
५) प्राचार्य, सीएसएमएसएस कृषि महाविद्यालय, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर
६) प्राचार्य, सीएसएमएसएस छ. शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर
७) प्राचार्य, सीएसएमएसएस तत्रनिकेतन महाविद्यालय, काचनवाडी, छत्रपती संभाजीनगर.
८) जनसंपर्क अधिकारी, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर